Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 570 – 574
DOI: 10.5281/zenodo.10258843

Original Research Article

# महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान : काल, आज आणि उद्या

प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र

तत्त्वज्ञान विभाग, शिवाजी महाविद्यालय हिंगोली ४३१५१३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: srbhusare44@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

**गोषवारा**

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने विचार करत असताना काही बाबी प्रकर्षाने जाणवतात त्यांचा गांभीर्याने विचार प्रत्येक भारतीयांने करणे ही आज काळाची गरज ठरत आहे. त्या दृष्टिकोनातून बारकाईने विचार केला तर काही गोष्टींचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो. त्या म्हणजे महात्मा गांधी आणि भारत यांचे समीकरण लक्षात होणे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सामील झालेले प्रत्येक नागरिक आणि महात्मा गांधी यांच्या सत्याग्रह लढ्याचा काय संबंध आहे ? तू कशा पद्धतीने वृद्धिगत करता येईल ? महात्मा गांधीचे तत्त्वज्ञान खरोखरचे एवढे महत्त्वपूर्ण आहे का ? कोण हे महात्मा गांधी? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे नवीन पिढ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी महात्मा गांधी आणि त्यांचे तत्त्वज्ञान सर्व पर्यंत पोहचवण्यासाठी, आचरणात आणण्यासाठी त्यासंबंधी मुलगामी विचार होणे गरजेचे आहे. महात्मा गांधींचा आचार विचार आणि व्यक्तिमत्व यांची खरोखरच आज समाजाला गरज आहे. महात्मा गांधी विचार आहे. महात्मा गांधी सामान्यातील सामान्य व्यक्तिमत्व आहेत. म्हणून ते सर्वांना आपलेच वाटतात. पण आपली एक अलिखित मान्यता आहे ती म्हणजे गांधी जन्मावे ते फक्त दुसऱ्याच्या घरात. कारण कोणालाही असे वाटते की गांधी म्हणजे सार्वजनिक आणि तरीही कोणाचे नाही. गांधींच्या कठोर तपश्चर्याची प्रत्येकाला भीती वाटते. म्हणून ते दुर्लक्षित राहतात. म्हणून महात्मा गांधी आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाची आवश्यकता तीनही काळात सारखीच असेल हे प्रस्तुत शोधनिबंधात सिद्ध करण्यात येणार आहे.

**संज्ञा**

एखाद्या संकल्पने संबंधी विचार करत असताना त्या संकल्पनेचा मतितार्थ लक्षात घेणे गरजेचे ठरते. प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय महात्मा गांधीचे तत्त्वज्ञान काल, आज आणि उद्या असा आहे. त्या दृष्टिकोनातून महात्मा गांधी आणि त्यांच्या तत्त्वज्ञानात चा उहापोह होण अपेक्षित आहे.

**प्रस्तावना**

महात्मा गांधी म्हटले तरी आपल्यासमोर एक कृश अशी चष्मा घातलेली विचार मग्न अशी आकृती उभी राहते. आणि नकळत आपली मान आजाराने खाली वाकते म्हणजेच गांधी हे त्रिकालबाधित सत्य आहे. त्या देश, काळ, परिस्थितीच्या मर्यादा नाहीत. असे ते एक अभंग, अनंत, अमर्याद, नित्य, कुठस्थानित्य, शाश्वत असे सत्य आहे. ही विशेषणे मी का लावत आहे यासंबंधी मी पुढे सविस्तर विश्लेषण करणार आहेच. गांधी ही फक्त एक व्यक्ती नाही तर ती भारतीयांचा आणि जगात पसरलेल्या गांधीवाद्यांची जीवन पद्धती म्हणजे जगण्याची रीत आहे. कितीही प्रयत्न करून प्रत्येकाने गांधी आपल्या जीवनातून हद्दपार करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला तरी ही नकळतपणे तो निर्गताच गांधींना अनुसरत असतो. त्याला मी माणूस आहे, आई-वडिलांनी मला जन्म दिला या गोष्टी कधीच नाकारता येत नाहीत. तसेच मी जन्मलो त्या अर्थी मी मरणार आहे हया गोष्टी नाकारता येत नाहीत. म्हणून ज्या पद्धतीने प्रत्येकजण सत्याचा स्वीकार करतो त्यानुसार तो गांधींचे अनुसरण करतो. कारण गांधी म्हणजे सत्य आणि सत्य म्हणजे गांधी हे समीकरणही त्रिकालबाधीत सत्य आहे. ते कुणी स्वीकारल्याने किंवा कोणी नाकारल्याने बाधित होत नाही. म्हणून या जगात गांधींचे मोठेपण, वेगळेपण सर्वांना जाणवतं. त्यासंबंधी प्रस्तुत शोधिबंधामध्ये सविस्तर विचार केला जाणार आहे.

**उद्देश**

१. महात्मा गांधी यांच्या जीवन कार्याबद्दल आजच्या पिढीला जागृत करणे.

२. महात्मा गांधींना न आचरता कोणीही जीवन जगू शकत नाही हे सर्व समाजाच्या लक्षात आणून देणे.

३. गांधी हे प्रस्थ त्रिकालबाधीत सत्य आहे हे मनावर बिंबवणे.

४. गांधी म्हणजे विसरण्याचा भाग नाही तर ती एक आदर्श जीवनपद्धती आहे हे सिद्ध करणे.

**विषय विश्लेषण**

सत्य म्हणजे गांधी आणि गांधी म्हणजे सत्य हे त्रिकालबाधित सत्य मान्य केल्यामुळे आपल्याला गांधी हे एक व्यक्तितत्व नाही हे लक्षात येते. गांधी म्हटले की आपण, जग का नतमस्तक होते याचा विचार मनात तरळून गेला आणि गांधी महात्म्य डोळ्यासमोर तरळूण गेले. गांधी एक साधासुधा किडीत-मिडीत माणूस पण तो जगासमोर एक आदर्श बनला आहे. याच कारणाचा शोध घेत असताना आपल्या लक्षात येते ती त्यांची तपस्या ज्या आधारे त्यांनी ही उंची गाठली काय आहे असे त्यांच्या ठिकाणी ? आपल्याला प्रश्न पडतो. त्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे सत्याग्रह, आचरणातील एकसंघपना म्हणजे गांधी हे उत्तर देता येते. एखाद्यासमोर सशस्त्र सेना उभी टाकलेली असतानाही तो निडरपणे, निशस्त्रपणे त्याचा समोरासमोर सामना करतो म्हणजे गांधी असे म्हणता येते. कारण असे धाडस कोणीही करू शकत

नाही. जे करू शकतात ते म्हणजे गांधी. गांधी हा कुणी एक चेहरा नाही. त्यामागे असत्याची सावलीही नाही. म्हणून गांधी बालाख्यांच्या सशस्त्र सैन्या समोरही एकटे निशस्त्रच पुरतात. म्हणून त्यांना वन मॅन आर्मी असे एक इंग्रज अधिकाऱ्याने म्हटले आहे. एवढा आत्मविश्वास, एवढी नितांत श्रद्धा त्यांची सत्यावर होती. लाखोंच्या सैन्यासमोर एक निशस्त्र माणूस अतिशय आत्मविश्वासाने जीवाची तमा न बाळगता पण शांततेचा संदेश देत सैन्याला सामोरा जात असे. म्हणून इंग्रज अधिकाऱ्याने त्यांच्यासंबंधी वरील विचार व्यक्त केले. स्वतः अगोदर एखादी गोष्ट अमलात आणण्याची आणि नंतर लोकांना सांगण्याची ही त्यांची पद्धत असल्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान त्यांनी स्वतः अनुसरून नंतर ते लोकांना सांगितले. म्हणून महात्मा गांधी हे भारतासमोरच नव्हे तर आज जगासमोर आदर्श ठरले आहेत. ते चालतं बोलतं तत्त्वज्ञान आहेत. म्हणून आपण भारतीयांनी त्यांच्या तत्त्वज्ञानाचे अनुसरण केले पाहिजे. पण ते केले जात नाही. त्यामुळे आज जी भारताची स्थिती झाली आहे त्याचा गांभीर्याने विचार केला गेला पाहिजे.

भारताचे राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक स्थिती अतिशय नाजूक बनली आहे. सर्वत्र स्वार्थ बोकाळला असल्यामुळे सर्वसामान्यांचे हाल होत आहेत. राजकीय लोकांना स्वतःच्या स्वार्थाची काळजी असल्यामुळे सर्वसामान्य समाज सैरभैर झाला आहे. म्हणून आज महात्मा गांधींच्या विचारांची कास धरणे अत्यंत अगत्याचे झाले आहे. पण ही गोष्ट आजच्या समाजात घडणेही दुशपास्त झाले आहे. कारण लोकांना गांधी म्हणजे सरकारी कचेरीच्या भिंतीवर लटकलेला फोटो एवढीच ओळख आजच्या लोकांना राहिली आहे ही आपल्यासाठी अतिशय दुर्दैवाची बाब आहे. त्या अनुषंगानेच प्रस्तुत शोधीबंधाचा विषय निवडण्यात आला आहे. गांधी काल, आज आणि उद्या अशा आशयच हा विषय निवडला गेला आहे.

सद्यस्थितीच्या गांभीर्याने विचार केला असता, असे लक्षात येते की, आपण महात्मा गांधींना बापू समजून त्यांना जे तत्त्वज्ञान लोकांमध्ये रुजवायचे होते ते सराईतपणे बाजूला सारून पळवाटा काढून त्यांचा अनुलेख करून त्यांना आणि त्यांच्या तत्वज्ञानाला संपवण्याचा घाट घातला आहे. तू आपणच संपवायला पाहिजे. 'गांधी काळ' या दृष्टीकोनातून आपण विचार केला असता भारतीय स्वातंत्र्याचा महत्त्वाचा टप्पा महात्मा गांधींनी सांभाळला. एक वेळ अशी आली की त्यांच्या असहकार आंदोलनाशिवाय भारतीय स्वातंत्र्याचा सूर्योदय होईल असे वाटत नव्हते. सत्याग्रह, असहकार या निशस्त्र शस्त्रांनी त्यांनी इंग्रज सरकारला नमवले. भारतीय स्वातंत्र्यलढा असो अथवा परदेशातील इतर लढे सर्व ठिकाणी त्यांच्या असहकार आंदोलनामुळे पिढीतांना न्याय मिळाला. त्यामुळे भूतकाळ म्हणजेच गांधींच्या हयातीत जगाला गांधींची, गांधी विचारांची अत्यंत आवश्यकता होती.

आजच्या दृष्टिकोनातून विचार केला असता समाजात अत्यंत अनाचार, अनागोदी माजलेली असल्यामुळे सर्वसामान्य माणसांच्या जीवनाचा अस्तित्वाचा प्रश्न गंभीर होत चाललेला दिसतो आहे. अनैतिकता बोकाळली आहे. आणि तिचा विस्फोट होतो आहे. अविश्वास वाढत झालेला आहे. मानसे अतताई आक्रमक बनत झालली आहे. अविवेक बोकाळला आहे. समाज एक विचित्र वळणावर येऊन थांबला आहे. नैतिकदृष्ट्या विचार करता समाजाला पर्यायाने मानवाला, भारतीय माणसाला आता गांधी विचारायची अत्यंत आवश्यकता आहे. कारण समाजाला एक स्थिर

विचाराची आवश्यकता आहे. जो जगाला 20 व्या शतकामध्ये महात्मा गांधींनी समाज, जगाला दिला. सामाजिक, राजकीय क्षेत्रात महात्मा गांधींचे सत्य, अहिंसावादी विचारांची आज घडीला अत्यंत आवश्यकता भासत आहे. म्हणून महात्मा गांधी बोलणे, ऐकणे आणि आचरणात आणणे अत्यंत असातत्त्याचे आहे. असे मला वाटते.

आज एकूण समाजाचा विचार केला असता सर्वत्र अनागोंदी कारभार आपल्याला दिसून येत आहे. फार मोठ्या प्रमाणात स्वार्थी लोक आज समाजात सर्वत्र वावरताना दिसत आहेत. त्यामुळे सत्य कोण ? असत्य कोण ? स्वार्थी कोण ? निस्वार्थी कोण हे सहजासहजी समजणे अवघड आहे. मला हा समाज बहुरूपी वाटत आहे त्यामुळे ज्यांच्याकडून काही घ्यावे असे कोण आहे हे शोधणे अत्यंत अवघड झाले आहे. नीतिमत्ता, नैतिक-सामाजिक बांधिलकी ही सर्व मूल्य आज रसातळाला गेली आहेत. समाज बेधुंद झाला आहे. समाज पर्यायाने मानवाचे आयुष्य धोक्यात येवू लागले आहे. म्हणून आज समाजात महात्मा गांधींच्या तत्त्वांची फार आवश्यकता भासू लागली आहे. म्हणून महात्मा गांधी आणि त्यांचे विचार आत्मसात करणे आवश्यक झाले आहे. म्हणून गांधी एक जीवन शैली, जीवन पद्धती आहे. ती आत्मसात केली तरच समाज पर्यायाने मानवी जीवन सुखकर होऊ शकते.

इंटरनेटच्या युगामध्ये मानवाने खूप भौतिक प्रगती केली आहे पण त्याच्या आत्मिक उन्नतीला मात्र तो मुकला आहे. कारण केवळ भौतिक प्रगती म्हणजे मानवाचा शाश्वत विकास नाही. मानवाचा शाश्वत विकास साधावयाचा असेल तर गांधींच्या तत्त्वाशिवाय पर्याय नाही. माणुस कितीही प्रगत झाला तरी तो अशांत, दुःखी, असमाधानी, बौद्धिक दृष्ट्या अविकसित भासत आहे. त्याच्या या अवस्थेमुळे तो अस्थिर झाला आहे. नको त्या भौतिक सुखाच्या मागे लागल्यामुळे त्याचीही अवस्था आहे असे महात्मा गांधी म्हणतात. त्यांनी दाखविलेल्या मार्गाने गेल्याशिवाय मानवी जीवनात उन्नती, प्रगती नाही असे ते म्हणतात. म्हणून भविष्याचा वेध घेणाऱ्या पिढ्यानंतर त्यांचे तत्त्वज्ञान आत्मसात करणे अगत्याचे आहे. कारण मानवी समाज विकसित झाला तसा तो अतिशय हिंस बनला. त्यामुळे मानव समाजाचे अस्तित्व धोक्यात आले. म्हणून महात्मा गांधी हे त्यावर पर्याय आहेत असे मला वाटते. त्यांनी दाखवलेल्या मार्गावरून मार्गक्रमण केल्याने सर्वांचे कल्याण संभवते. कारण महात्मा गांधींचे, तत्त्वज्ञान म्हणजे यशाची गुरुकिल्ली म्हणून भविष्यात येणाऱ्या पिढ्यांनी महात्मा गांधींचा विसर पडू देणे कामाचे नाही. हे सर्वांनी ध्यानात घेणे आवश्यक आहे. म्हणून महात्मा गांधी हे त्रिकाल बाधित सत्य आहे. गांधी काल, आज आणि उद्या या न्यायाने गांधी हे सर्व कालिक आहे हे मान्य करावेच लागते.

**सारांश**

सारांश रुपाने असे म्हणता येईल की, महात्मा गांधी हे जगाला अनिवार्य ठरले आहेत. त्यांच्या जीवन पद्धती च्या आधारावर त्यांच्या तत्त्वांच्या आधारावर ते आपण जोपासले पाहिजे. जीवन संभाव्यसाठी महात्मा गांधीचे चरित्र आणि तत्त्वज्ञान आत्मसात करावे लागते. गांधी हे चालतं बोलत तत्त्वज्ञान होते. ते आचरणशील तत्त्वचिंतक होते. आपण आज ह्या सर्वच गोष्टी विसरत चाललो आहोत. म्हणून आपण जर गांधींना विसरलो तर आपण तिथेच संपलं हे काळया दगडावरची पांढरी रेघ. म्हणून आपण या गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

## निष्कर्ष

१. महात्मा गांधी यांच्या तात्विक विचारांचा प्रचार आणि प्रसार करणे.

२. महात्मा गांधी यांचे तत्त्वज्ञान कसे तीनही पिढ्यांसाठी महत्त्वाचे आहे हे दाखवून देणे.

३. महात्मा गांधी हे अवतार पुरुष नसून ते महापुरुष होते हे लोकांच्या लक्षात आणून देणे.

४. महात्मा गांधी यांच्या तत्त्वांचा स्वीकार केल्याखेरीज समाज कल्याण साधणार नाही हे लोकांना नव्याने पटवून देणे.

## संदर्भ सूची

१. 'सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा', मो.क.गांधी नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद.

२. तत्रेव.